# मा. ना. श्री. गणेश नाईक, मंत्री, राज्य उत्पादन शुल्क, अपारंपारिक ऊर्जा मंत्री यांचे स्व–परिचय पत्र

| | | |
|---|---|---|
| १) | संपूर्ण नाव | : श्री. गणेश रामचंद्र नाईक |
| २) | जन्म दिनांक | : १५ सप्टेंबर १९५० |
| ३) | जन्म ठिकाण | : खैरणे, बोनकोडे, ता. ठाणे, जि. ठाणे |
| ४) | धर्म, जात | : हिंदू, आगरी (इतर मागासवर्ग) |
| ५) | कायमचा पत्ता | : १०२, बालाजी गार्डन, सेक्टर– ११, कोपरखैरणे, खैरणे (बोनकोडे), ता. जि. ठाणे, नवी मुंबई.<br>दूरध्वनी क्र. २७५४ २०४२ |
| ६) | पत्रव्यवहाराचा पत्ता | : रामचंद्र निवास, बोनकोडे (खैरणे), ता.जि. ठाणे, नवी मुंबई |
| ७) | कार्यालयाचा पत्ता | : मंत्री, राज्य उत्पादन शुल्क, अपारंपारिक ऊर्जा यांचे कार्यालय, खोली क्र. ५७०–मुख्य, ५वा मजला, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.<br>दूरध्वनी क्र. २२०२ ४५३५, २२०२ ९१४८ |
| ८) | शिक्षण | : पदवीपर्यंत |
| ९) | ज्ञात भाषा | : मराठी, हिंदी, इंग्रजी |
| १०) | व्यवसाय | : बांधकाम व्यवसायिक |
| ११) | विवाहीत/अविवाहीत | : विवाहीत |
| १२) | मतदारसंघ | : १५१ – बेलापूर, जिल्हा – ठाणे |
| १३) | राजकीय पक्ष | : राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष |
| १४) | पक्ष संघटनेतील कार्य | : पक्षाच्या स्थापनेपासूनच उपाध्यक्ष या पदावर कार्यरत. ठाणे जिल्हयात पक्ष वाढविण्यासाठी मोलाचे योगदान. नवी मुंबई महानगरपालिका, मीरा–भाईदर महानगर पालिका, ठाणे जिल्हा परिषद इ. ठिकाणी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची सत्ता आणण्यात महत्वाचे योगदान. ठाणे लोकसभा मतदारसंघावर राष्ट्रवादी |

कॉंग्रेसचा झेंडा फडकविण्याची ऐतिहासिक कामगिरी. बेलापूर आणि ऐरोली विधानसभा मतदारसंघावर राष्ट्रवादी कॉंग्रेससाठी विजय प्राप्त केला.

१५) मंत्री म्हणून उल्लेखनीय काम. : १९९० पासून बेलापूर मतदार संघातून आमदार म्हणून विजयी.
सन १९९५ मध्ये मंत्री, वने व पर्यावरण म्हणून अनेक महत्वाचे निर्णय घेतले. वन कर्मचाऱ्यांना ५वा वेतन आयोग लागू करण्यात सिंहाचा वाटा तसेच वन कर्मचाऱ्यांना स्व–संरक्षणासाठी शस्त्रे मिळवून देण्यात पुढाकार.
सन २००४ ते २००९ पर्यंत मंत्री. राज्य उत्पादन शुल्क, पर्यावरण व कामगारमंत्री म्हणून काम.
राज्य उत्पादन शुल्क खात्याच्या उत्पन्नात विक्रमी वाढ. राज्यातील उद्योग प्रकल्पांना अनुमती देण्याची प्रक्रिया सुलभ आणि गतीमान केली.
प्रदुषण नियंत्रणासाठी राज्यभर प्रभावीपणे उपाययोजना राबवल्या. अविघटनशील घनकचरा विल्हेवाट कायदा तयार केला. समान कामासाठी समान वेतनाच्या कायद्याची अंमलबजावणी.
७ नोव्हेंबर २००९ पासून पुन्हा राज्य उत्पादन शुल्क मंत्री म्हणून नियुक्ती. याशिवाय अपारंपारिक ऊर्जा खात्याचा कार्यकार.

१६) सामाजिक कार्य :
१) संपूर्ण महाराष्ट्रात विनाशुल्क ५० पेक्षा अधिक रूग्णवाटिकांचे वाटप
२) ठाणे व रायगड जिल्हयातील विद्यार्थ्यांना दरवर्षी सुमारे २५ लाख रूपयांच्या वहयांचे मोफत वाटप
३) नैसर्गिक आपत्तीचे वेळी ५० लाख रूपयांचे मोफत औषधांचे वाटप.
४) सुमारे १ लाख बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करून दिला.

| | | | |
|---|---|---|---|
| १७) | विशेष उल्लेखनीय कार्य | : | १) ठाणे जिल्हयातील कुपोषणग्रस्त बालके दत्तक घेण्यासाठी स्वत:च्या व्यक्तीगत उत्पन्नातील सुमारे १० लक्ष रूपयांचा निधी उपलब्ध करून दिला.<br>२) ठाणे जिल्हयाचे पालकमंत्री म्हणून जनता दरबारच्या माध्यमातून सर्वसामान्यांच्या प्रश्नांची सोडवणूक. |
| १८) | शैक्षणिक व सांस्कृतिक कार्य | : | १) श्रमिक मंडळाच्या माध्यमातून रा.फ.नाईक, फकीरजी नाईक शाळा आणि महाविद्यालयाची स्थापना<br>२) जीवन आधार संस्थेमार्फत असंघटीत कामगारांसाठी जनश्री विमा योजना.<br>३) ग्रीन होप संस्थेच्या माध्यमातून भव्य प्रमाणावर वृक्षारोपण, खारफुटींचे संवर्धन इ. उपक्रम.<br>४) नवी मुंबई क्रीडा संकुलाच्या माध्यमातून दरवर्षी ऑलंपिक दर्जाचा क्रीडा महोत्सव<br>५) नवी मुंबई शिक्षण संकुलाच्या माध्यमातून दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी भव्य प्रमाणावर सराव परिक्षा, गुणवंत विद्यार्थ्यांचा जाहीर सत्कार.<br>६) नवी मुंबई कला संकुलाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसाठी चित्रभारती ही चित्रकला स्पर्धा. या स्पर्धेमधून सर्वधर्म समभावाची जपणूक. नाटय स्पर्धेचे जिल्हास्तरीय चित्रकला स्पर्धा आयोजन. |
| १९) | छंद आणि विशेष आवड | : | प्रगत शेतीचे वेगवेगळे प्रयोग करणे. बायोडिझेलसाठी प्रयत्न. |
| २०) | परदेश प्रवास | : | रशिया, जपान, हॉगकॉग, बॅकॉक, दुबई, मस्कत, अबुदाबी, चीन, मलेशिया, थायलंड, मकाव, नॉर्वे, स्वीडन, जर्मनी, इंग्लंड, फ्रान्स, स्वीत्झर्लंड, हॉलंड, ऑस्ट्रिया, इटली, ईस्त्रायल इत्यादी देशांचे अभ्यासदौरे. |